MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१५४ | मंगळवार दि.१८ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -154 | TUESDAY DT.18 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |




## पिंपळनेर जिल्हा परिषद गटात माजी खासदार प्रितमताई मुंडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा –रामदास नाना बडे

रायमोहा(प्रतिनिधी)

शिरूर कासार तालुक्यातील पिंपळनेर जिल्हा परिषद गटाचे अभ्यासू कार्यतत्पर जिल्हा परिषद सदस्य रामदास नाना बडे यांनी बीड लोकसभेच्या माजी खासदार तथा आहिल्यानगर -बीड-परळी रेल्वेच्या शिल्पकार डॉ प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांचा वाढदिवस पिंपळनेर जिल्हा परिषद गटात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यामध्ये जिल्हा परिषद शाळा दहिफळेवस्ती येथील विद्यार्थी यांना वही,पेन,गणवेश,ट्राफी ,खाऊचे वाटप करण्यात आले अनावश्यक खर्चाला फाटा देत जिल्हा परिषद सदस्य रामदास नाना बडे यांनी खासदार प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांचा अगळा वेगळा वाढदिवस साजरा केला व गेल्या सात वर्षापासुन गरीब विद्यार्थी यांना माजी खासदार प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय साहित्य वाटप करून प्रोत्सहान देत असतात खासदार प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांचा वाढदिवस विद्यार्थी यांना शालेय साहित्य वाटप करून केल्याबद्दल खुद्द माजी खासदार प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांनी जिल्हा परिषद सदस्य रामदास नाना बडे यांचे भ्रमणध्वनीवर संपर्क करून कौतुक केले आहे

# दुसऱ्यांदा गुन्हा केला तर कडक कारवाई होईल:१५० कुख्यात गुन्हेगारांना दिली तंबी

## पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत ॲक्शन मोडवर

बीड /प्रतिनिधी

बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत क्शन मोडवर आले आहेत. नवनीत कॉवत यांनी हत्येचा प्रयत्न करणाऱ्या जिल्ह्यातील जवळपास दीडशे आरोपींना तंबी दिली आहे. या सर्व आरोपींना पोलिस अधीक्षक कार्यालयात बोलावण्यात आले होते. यावेळी नवनीत कॉवत यांनी दुसऱ्यांदा गुन्हा करू नका, अन्यथा कडक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा थेट इशाराच दिला आहे.

पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी यापूर्वी वाळू माफियांना इशारा दिला होता. त्यानंतर त्यांनी कुख्यात गुन्हेगारांना तंबी दिली आणि आता हत्येचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना देखील कारवाईचा इशारा दिला आहे. दुसऱ्यांदा गुन्हा केला तर कारवाईला समोरे जावे लागेल असा इशारा नवनीत कॉवत यांनी या गुन्हेगारांना दिला आहे.



**दरम्यान, आता बीड जिल्हा कारागृहाचे स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार आहे. याच कारागृहात संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडला कोठडीत ठेवण्यात आले आहे. देशमुख हत्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीने बीड जिल्हा कारागृहाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याच अनुषंगाने सोमवारी पोलिस अधीक्षकांच्या टीमने या संदर्भात आढावा घेतला आहे. दहा ते बारा बाबींवर कारागृहाचे ऑडिट होणार आहे. बीड जिल्हा कारागृह निजामकालीन असून इमारत कमकुवत आहे. कारागृहातील सीसीटीव्हीचे नूतनीकरण करायचे आहे. त्याबरोबरच सुरक्षा यंत्रणा देखील अद्यावत गरजेचे असल्याचे म्हटले आहे.**

बीड जिल्ह्यातील मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील काही आरोपी अद्यापही फरार आहेत. यावर मंत्री पंकज भोयर यांना विचारले असता या प्रकरणातील जवळजवळ सर्व आरोपीना अटक झालेली असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. तर या प्रकरणावर गृह विभाग अत्यंत गंभीर असून योग्य पद्धतीने चौकशी सुरू आहे. अशी प्रतिक्रिया मंत्री भोयर यांनी दिली.

भाजप आमदार सुरेश धस यांनी देखील फरार आरोपी कृष्णा आंधळे याच्याविषयी भाष्य केले आहे. पत्रकारांशी बोलताना सुरेश धस म्हणाले, कृष्णा आंधळे संभाजीनगर येथे पोलिस भरतीची तयारी करत होता. नंतर तो गुन्हेगारीकडे वळला. जे काही गुन्हे त्याने केले आहे या गुन्ह्यामध्ये तो या पूर्वी सुद्धा घरादाराची फिकीर न करता बाहेर पळाला आहे. माझी सुद्धा इच्छा आहे तो लवकरात लवकर सापडला पाहिजे. तेवढाच एक कोकरू बाळ यातला शिल्लक राहिला आहे. आतापर्यंत ९ आरोपी ३०२ मध्ये आत गेले आहेत.

# आगामी महापालिका निवडणुकीत भाजपाचा स्वबळाचा नारा?

## अमित शाहांच्या निर्णयाकडे लक्ष

प्रतिनिधी । मुंबई

३ महिन्यापूर्वी राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपानेमहायुतीत निवडणूक लढवून १३२ जागांपर्यंत मजल मारली आहे. मागील काही काळातला भाजपासाठी हा ऐतिहासिक विजय आहे. त्यामुळे नेत्यांचा उत्साह वाढलेला आहे. त्यातच येणाऱ्या महापालिका निवडणुकीत पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवावी असा सूर नेत्यांमध्ये पाहायला मिळत आहे. अलीकडेच भाजपाच्या कोअर कमिटी बैठकीत वरिष्ठ नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती नको तर स्वबळावर निवडणूक लढवू असं मत व्यक्त केले आहे.

सूत्रांनुसार, राज्यातील नेत्यांच्या या मताला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही सहमती असल्याचं बोललं जाते. २२ फेब्रुवारीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह पुणे दौऱ्यावर आहेत



यावेळी फडणवीस आणि शाह यांच्यात यावर सविस्तर चर्चा होण्याची शक्यता आहे. भाजपाच्या स्वबळाच्या योजनेमुळे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत खळबळ माजली आहे. महायुतीतील तिन्ही पक्षांनी एकत्रितपणे निवडणूक लढवायला हवी, एकट्याने निवडणूक लढवल्यामुळे त्याचे नुकसान महायुतीत सहभागी सर्व पक्षाला होऊ शकते असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे.

शिंदे-फडणवीसांमध्ये संघर्ष?

महायुती सरकारच्या स्थापनेपासून अनेकदा एकनाथ शिंदे यांच्या नाराजीच्या बातम्या झळकल्या आहेत. सुरुवातीला मुख्यमंत्रिपदावरून एकनाथ शिंदे नाराज असल्याचं समोर आले. महायुतीत सर्वाधिक जागा जिंकून भाजपाने मुख्यमंत्रिपदावर दावा केला. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतील हे नेते बोलू लागले. त्यानंतर सरकार स्थापनेत उपमुख्यमंत्रिपद घ्यायचे की नाही यावरूनही एकनाथ शिंदेंनी शेवटपर्यंत ठोस निर्णय घेतला नाही.

आता सरकारमध्येही या दोन्ही नेत्यांमध्ये छुपा संघर्ष सुरू असल्याचं राजकीय वर्तुळात चर्चा आहे.दरम्यान, स्वबळावर लढायला आमची काही हरकत नाही. आम्ही कमजोर नाही. आम्ही आमचे लढू शकतो. मात्र आपापल्या वादविवाद होऊ नयेत. संघर्ष होऊ नये ही त्यामागची भूमिका आहे अन्यथा स्वबळावर प्रत्येकजण लढू शकतो. येणाऱ्या निवडणुका महायुतीत लढवाव्यात ही शिवसेनेची भूमिका आहे. काही ठिकाणी कार्यकर्त्यांचा आग्रह असला तरी महायुतीत न लढण्याचा परिणाम मतदारांवर होतो हे अनुभवलं आहे. स्थानिक पातळीवर निर्णय व्हायला लागले तर युती होणार नाही असं चित्र दिसते. त्याचा भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंनी गांभीर्याने विचार केला पाहिजे.महायुतीत लढलो तर महायुती म्हणून मतदार सोबत राहतील असं शिवसेना मंत्री संजय शिरसाट यांनी भूमिका मांडली आहे.

# विजयसिंह पंडित यांच्या १०० दिवसाचा लेखा जोखा....! प्रचंड विश्वासाचे शतक पूर्ण....!



प्रतिनिधी । गेवराई

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे कार्यतत्पर आमदार विजयसिंह पंडित हे विजयी झाल्यापासून त्यांनी मा. आ.अमरसिंह पंडितांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघांमध्ये विकास कामांसह प्रशासकीय बैठकांचा धडाका लावला आहे.अवघ्या शंभर दिवसांमध्ये त्यांनी विकास कामांसह कृषी,आरोग्य, सिंचन, यासह विविध विषयांमध्ये चांगले काम केले आहे. त्यांना आमदार होऊन शंभर दिवस पूर्ण झाले आहेत या कार्यकाळात केलेल्या कामांचा लेखा जोखा शनिवारी गेवराई येथे आयोजित सदस्य नोंदणी अभियान व पदाधिकारी मेळाव्यात मा.आ.अमरसिंह पंडित यांनी उपस्थितांसमोर मांडला आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आमदार झाल्यानंतर शंभर दिवसांमध्ये अत्यंत चांगली कामगिरी केली आहे.त्यांच्या माध्यमातून विकासपर्व सुरू असल्याचे चित्र मतदार संघात पहावयास मिळत आहे.

# बीडमध्ये काहीही घडू शकतं! जिल्हाधिकाऱ्याची गाडी जप्त

राज्याच्या राजकारणात बीड जिल्हा सर्वाधिक चर्चेत आहे. बिहारलाही लाजवेल असे गुन्हेगारी कारनामे बीडमध्ये सर्रास होत असल्याचे समोर येत आहे. येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याकांडाने जिल्हाच नाही तर महाराष्ट्र हादरला. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी दबाव वाढत आहे. बीडमध्ये कधी काय घडेल याचा नेम नाही. बीडचं राजकारण आणि प्रशासन एका व्यक्तीच्या इशाऱ्यावर हलतं असं म्हटलं जातं. मात्र बीड जिल्हा प्रशासन ज्यांच्या इशाऱ्यावर चालतं, त्यांच्यावरच कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची शासकीय गाडी जप्त करण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत. या आदेशाची अंमलबजावणीही तडकाफडकी करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील चिखल बीड येथे १९९८ मध्ये लघु सिंचन प्रकल्प उभारण्यात आला होता. या प्रकल्पासाठी तीन शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या. त्या शेतकऱ्यांना तुटपुंजा मोबदला देऊन त्यांची बोळवण करण्यात आली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी न्यायालयात धाव घेतली. १९९८ पासून संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा अद्याप मिळालाच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना ३२ लाखांची भरपाई देण्याचे आदेश माजलगाव सत्र न्यायालयाने दिले. कोर्टाच्या आदेशानंतरही शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळाले नाही. नऊ वर्षांपासून जिल्हाधिकारी आणि तहसिलदारांच्या कार्यालयाच्या खेट्या घालूनही पैसे मिळत नसल्याने शेतकरी हातबल झाले होते. शेतकऱ्यांनी अखेर कोर्टात धाव घेतली. कोर्टाने शेतकऱ्यांच्या न्याय मागण्या मान्य करत त्यांच्या बाजूने निकाल दिला.

कोर्टाने शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिल्यानंतरही प्रशासनाला जाग आली नाही. त्यांनी कोर्टाच्या आदेशाचे पालन केले नाही. शेतकऱ्यांना बीड प्रशासन काय करु शकते याचे जीवंत उदाहरण देत कोर्टाच्या आदेशाकडे सपशेल दुर्लक्ष केले. शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला दिलाच नाही. शेतकऱ्यांनी पुन्हा कोर्टाचे दार ठोठावले. कोर्टाने त्यांचे सर्व म्हणणे ऐकून घेतले. संपूर्ण प्रकरण समजून घेत कोर्टाने बीड जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दिले. त्यानंतर आज बीडचे जिल्हाधिकारी अविनास पाठक यांची धावती कार अडवून जप्त करण्यात आली.

माजलगाव कोर्टाच्या या आदेशाने बीडच्या इतिहासात आणखी एक नवा अध्याय लिहिला गेला. बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांची गाडी इतिहासात प्रथमच जप्त करण्यात आली. बीडचे पालकमंत्री अजित पवार आहेत. त्यांनी बीडचे पालकत्व घेतले आहे. त्यानंतर दुसऱ्याच आठवड्यात बीड जिल्हाधिकाऱ्यांची गाडी कोर्टाने जप्त करुन कोर्टाच्या आवारात आणून ठेवली आहे. कोर्टाने काही दिवसांची मुदत जिल्हा प्रशासनाला दिली आहे. निर्धारित मुदतीमध्ये शेतकऱ्यांना त्यांचा मावेजा दिला गेला नाही तर कोर्ट गाडीचा लिलाव करण्याचे आदेश देण्याची शक्यता आहे.

# आर्ट ऑफ फन अकॅडमीचा सन्मान सोहळा उत्साहात साजरा..!

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई शहरातील सुप्रसिद्ध आर्ट ऑफ फन अकॅडमी ने यावर्षी घेण्यात आलेल्या राज्य बालनाट्य स्पर्धेत यश मिळवले व चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकंरडक २०२५ चा जोडी नृत्यमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिकासह नृत्य प्रकारामध्ये जिल्ह्यातील सर्वोच्च बेस्ट डान्स टीचरच्या दोन्ही पुरस्कार मिळवत बहुमान मिळवला. त्याबद्दल आर्ट फ फन अकॅडमी गेवराई येथे साई सेवाभावी संस्थेच्या वतीने सहभागी व विजेते स्पर्धकांचा सन्मान करण्यात करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सौ रत्नमाला (नानी) मोटे, सौ.माधुरी कुरकुटे,शाहिर श्री.बाप्पु सोनवणे, पत्रकार तथा ड. शेख हारुन, उपस्थित होते. सविस्तर वृत्त असे की दि. १ फेब्रुवारी २०२५ पासून ते ८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत बीडमध्ये ९ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकंरडक २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा दि ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रतिष्ठित मान्यवर, शिक्षक, स्पर्धक व पालकांच्या उपस्थितीमध्ये भव्य दिव्य सोहळा संपन्न झाला. चंपावती महोत्सवामध्ये नृत्य, एकपात्री अभिनय, गायन, चित्रकला आणि रांगोळी आदी स्पर्धा ठेवण्यात आल्या होत्या तर परळी, अंबाजोगाई, शिरूर कासार,बीड आणि गेवराई तालुका तर जिल्ह्यातून एकुण १४००० हजार पेक्षा अधिक विद्यार्थ्यी स्पर्धकांचा समावेश झाला होता. या सर्व स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळात बीड जिल्ह्याचा बेस्ट डान्स टीचर पुरस्कारने



**साई सेवाभावी संस्था, कोळगाव यांनी केला बाल कलावंतांचा सन्मान**

दिपक गिरी सर व शिवकुमार सोनवणे सर यांना सन्मानित करण्यात आले. तसेच, पहिली ते तिसरी गटात, श्लोक मानधने याने एकपात्री अभिनय स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला तर, जोडी नृत्य मधे श्लोक मानधने व स्वरा झेंडेकर यांना उत्तेजार्थ पारितोषक प्राप्त झाले., आरोही वाघमारे व विदिशा जाधव यांना द्वितीय तर अंनवी खेत्रे व राधिका मोटे यांना प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. तर, चौथी ते सहावी गटात ज्ञानदा जोशी व हिर सोनाग्रा यांना द्वितीय पारितोषिक मिळाले तर, आयुष कांडेकर व काव्या मुंदडा यांना तृतीय पारितोषिक मिळाले.व मन्मथ वादवाणी व आर्या वावरे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.तसेच एकपात्री अभिनय स्पर्धेत,ज्ञानदा जोशी हिला द्वितीय, काव्या मुंदडा द्वितीय, तर श्लोक मानधने ला तृतीय पारितोषिक मिळाले. तसेच वैयक्तिक नृत्य स्पर्धेत, काव्या मुंदडा व अण्वी मुंदडा यांना परीक्षक पसंती पुरस्कार प्राप्त झाला. व वयक्तिक गीत गायन स्पर्धेत उमंग सोमाणी याला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले तर फॅमिली नृत्य स्पर्धा मधे मानधने परिवार व कांडेकर परिवार यांना पुरस्कार प्राप्त झाला. तसेच समूह नृत्य मधे दिपक गिरी सर व जोडी नृत्य मधून शिवकुमार सोनवणे सर यांना जिल्यातील प्रतिष्ठित समजला जाणारा बेस्ट डान्स टीचर पुरस्काराने विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. तसेच राज्य बालनाट्य स्पर्धेत उत्तम अभिनयासाठी युवराज घाडगे व विशेष सहकार्यासाठी विवेक शर्मा याला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.ह्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन तथा नियोजन रोहित पुराणिक सर यांनी केले. ह्या यशाबद्दल आर्ट ऑफ फन अकॅडमी मधील सर्व विद्यार्थी पालक व शिक्षकांवर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.तसेच हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री.गणेश अवंतकर सर, व साई सेवाभावी संस्था कोळगाव, ता.गेवराई जि.बीड यांनी मार्गदर्शन तथा सहकार्य केले.

# शिवराय असे शक्तीदाता

## विष्णुबाळ दत्तात्रय झोडगे

### समदीप सामाजिक प्रतिष्ठान बीड

युगे संपूण जातील, काय वर्णावी गाथा।
शिव तुज प्रतापतेजापुढे नतमस्तक हा माथा।।

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म स्वराज्यसंकल्पक शहाजी महाराज आणि स्वराज्यप्रेरिका राजमाता माँसाहेब जिजाऊंच्या पोटी शिवनेरी किल्ल्यावर १९फेब्रुवारी १६३०रोजी झाला. शहाजी महाराज आणि माँसाहेबांनी अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धेत खितपत पडलेल्या आपल्या रयतेला मुक्त करण्यासाठी, स्वराज्याचं स्वप्न पाहिलं होतं आणि त्यांचं हे स्वप्नं छत्रपती शिवाजी महाराजांनी ध्येय मानून वास्तवात आणलं.

त्यावेळी स्वराज्याचं स्वप्नं पाहणं हेच मुळी आकाशाला गवसणी घालण्यासारखं होतं कारण तो काळ होता मोघली सत्तेचा, बेधुंद बादशाहीचा, जिथे मोगली फौजा दिवसाढवळ्या गावात घुसायच्या माणसाच्या कत्तली करायच्या, आयाबहिणींची अब्रू लुटायच्या, सगळीकडे जाळपोळ विध्वंस करत असे हे मोघली सैन्य, हातातोंडाशी आलेल्या राणातल्या पीकांची नासधूस करत असे, लोकांची उपासमार होत होती सर्वत्र भीती पसरलेली होती, परंतु या रयतेला वाचवणारं कुणीही नव्हतं, येथील भूमिपुत्रांची ही दयनीय अवस्था पाहून शहाजी महाराज माँसाहेब जिजाऊ अस्वस्थ होत आपल्या लोकांना अन्यायातून मुक्त करायचं असेल तर आपलं राज्य निर्माण करावं लागेल असं दोघांनाही वाटत होतं.बालशिवबाचा जन्म झाला आणि माँसाहेब त्यांना स्वराज्य निर्माणासाठी तयार करू लागल्या

त्यासाठी बालवयातच माँसाहेबानी शिवबांना सर्व प्रकारचं शिक्षण म्हणजे शस्त्र चालवणे, निरनिराळ्या भाषा शिकवणे, घोडेस्वारी, दांडपट्टा चालवणे, समाजकारण, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण, स्वतःच्या निगराणीत दिले . त्यासोबत संघर्ष, जिद्द, मेहनत, चिकाटी या गोष्टी सुद्धा माँसाहेब बालशिवबाना कृतीतून समजावत असत



आणि शिवबाराजे प्रत्येक गोष्ट तितक्याच तडफदारपणे शिकत होते. त्यांच्या अंगी शौर्य, पराक्रम, शारीरिक क्षमता, ध्येयवाद, कुशल संघटक, कडक व नियोजनबद्ध प्रशासन शिस्त, मुत्सद्दीपणा, धाडस असे उच्च कोटीचे गुण होते.

आज भारत देशात नाहीतर संपूर्ण जगात छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास गौरवाने सांगितला जातो, अभ्यासला जातो. अलीकडील काळात आपण शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करतो. परंतू शिवजयंती केवळ इव्हेंट न होता खऱ्या अर्थाने शिवविचारांचा जागर करून त्या विचारांना प्राधान्य देत आपण तशी कृती करू तेंव्हा महाराजांची जयंती सार्थकी लागेल असं मला वाटतं. आणि त्यासाठी आपल्याला आपल्या मुलांना या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास वारंवार सांगावा लागणार आहे पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्तचा, पाठ्यपुस्तकात फार फार तर शिवाजी महाराजांचा जन्म, अफजलखानाचा वध,पुरंदरचा तह, आग्र्याहुन महाराजांची सुटका या गोष्टी वाचायला मिळतात तेही परीक्षेत विचारलेल्या प्रश्नाची उत्तर देण्यापुरता अभ्यास विद्यार्थी करतात.

छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र फक्त लढायापुरते मर्यादित नाही खरंतर महाराजांनी थेट लढाया कमीच केल्या होत्या, आपल्या बुद्धीच्या बलावर स्वराज्यविस्तार करून रयत सुखी कशी राहील यासाठी अधिक प्रयत्न केले यासाठी महाराजांनी प्रसंगी शत्रूला गनिमी कावा करून, कधी नुकसान टाळण्यासाठी शत्रूशी तह करून, कधी मैत्रीचा हात पुढे करत स्वराज्य वाढवले हे सगळं करत असताना रयतेस पोटास लावणे हा विचार महाराजांच्या मनात होता. आणि म्हणून सुरुवातीच्या काळात माँसाहेब जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली प्रथम विखुरलेल्या समाजाला एकत्र केले त्यांना शेत जमिनी वहायला दिल्या, बी-बियाणे आवश्यक त्या गोष्टी दिल्या जमिनी पिकू लागल्या लोक पोटाला पोटभर खाऊ लागले. शेत साऱ्यासाठी वतनदाराकडून होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी वतनदारी रद्द केली जमिनी पिकल्या तर स्वराज्याला तिसरा हिस्सा नाही पिकली तर स्वराज्यातून दाणागोटा ची सोय केली जाईल हे धोरण अवलंबिले शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावाल तर खबरदार अशी तंबी महाराजांनी आपल्या सरदार व सैनिकांना सुद्धा दिली होती खर्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकऱ्यांचे कैवारी होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात सर्व जाती-धर्माचे लोक होते, या अठरापगड जातींना एकत्र करून त्यांना स्वराज्यातील मावळा या एका शब्दात संबोधले, हे सगळे मावळे स्वराज्यासाठी लढले, प्रसंगी प्राणाची बाजी लावून स्वराज्याच्या कामी आले खऱ्या अर्थाने जातिअंत महाराजांनी आपल्या स्वराज्यात घडवून आणला होता.

महिलांचा आदर सन्मान करणे हा तर महाराजांनी स्वराज्याचा नियमच बनवला होता, स्त्रियांवरअन्याय करणाऱ्याविषयी महाराजांना अत्यंत चीड होती जेंव्हा रांझ्याच्या पाटलाने एका मुलीवर हात टाकला तेंव्हा त्याचा चौरंगा करून त्याला शिक्षा दिली, इतकच नाही तर आपला सख्खा मेव्हणा सखूजीराव गायकवाड यांना सुद्धा सावित्रीबाई देसाईंचा विनयभंग केल्याप्रकरणी तप्त सळईने डोळे काढून अंधारकोठडीत डांबून टाकले या दोन घटना व्यतिरिक्त स्वराज्यात महिलांवरील अत्याचाराची तिसरी घटना घडली नाही. केवळ आपल्याच नाही तर शत्रूंच्या स्त्रियांनासुद्धा सन्मानपूर्वक साडीचोळी करून बहिणीप्रमाणे वाट लावणारा एकमेव भाऊ म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज.

रायगडा सारख्या प्रचंड कठीण गडाचा कडा आपल्या लेकराच्या ममतेने व्याकूळ झालेली हिरकणी जेव्हा उतरून गेली आणि ही गोष्ट महाराजांना कळली तेव्हा तिला सजा न देता तिच्या शौर्याचा सन्मान महाराजांनी केला ती उतरून गेलेल्या कड्याच्या जागी बुरुज बांधून त्याला हिरकणी बुरूज असे नाव दिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात सर्वात सुखी होता तो शेतकरी आणि सर्वात सुरक्षित होती ती स्त्री असं स्वराज्य कोणास नको म्हणूनच ३९० वर्षानंतर सुद्धा आम्हाला वाटते महाराज तुम्ही पुन्हा जन्माला या.

परकीय सागरी आक्रमणांची चाहूल लागताच महाराजांनी आपलं सागरी आरमार उभा करण्यासाठी हालचाली सुरू केल्या त्यासाठी मोठ्या प्रमाणावर लाकूड-फाटा लागणार होता, परंतु तो गोळा करत असताना सगळ्यात जुनं आणि वाळून गेलेला झाड तोडून त्याचा उपयोग जहाज बनवण्यासाठी करावा आणि ते झाड तोडण्याआधी त्या ठिकाणी आजूबाजूला शंभर झाडे लावावीत असा आदेश महाराजांनी आपल्या सरदारांना दिला. यावरून महाराजांची दूरदृष्टी स्पष्ट होते. पर्यावरणाची काळजी घेण्याचं काम सुद्धा महाराज करत होते. आज पर्यावरणाचा होणारा ऱ्हास बघता आता तर आपल्याला जंगलच लावावी लागणार आहेत, पण कोण लावणार कारण आपल्याला सगळं आयतं पाहिजे आहे.

शिवाजी महाराजांनी जिंकलेले, बांधलेले अनेक किल्ले आज अस्तित्वात आहेत, त्यांचं संवर्धन करून हा ऐतिहासिक ठेवा पुढच्या अनेक पिढयांना पाहता यावा म्हणून टिकवून ठेवण्याची जबाबदारी सरकारची असली तरी पर्यटक म्हणून आपण जेंव्हा किल्ल्यावर जातो तेंव्हा आपण सुद्धा तिथे जबाबदारीने वागलं पाहिजे म्हणजे तिथे कसल्याही प्रकारचा कचरा न करणे, दगडावर नाव न लिहिणे, दारू पिऊन धिंगाणा न घालने, हे आपलं कर्तव्य समजून वावरलं पाहिजे

छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वराज्यकारभार आदर्श घ्यावा असा आहे आजच्या सरकारांना, शिवरायांची नीतिमूल्यं प्रेरणादायी आहेत आजच्या तरुणांना, शिवरायांचे दूरदृष्टी ठेऊन घेतलेले अनेक निर्णय प्रमाण आहेत अनेक कार्याच्या सुरुवातींना, छत्रपती शिवाजी महाराजांचा गनिमी कावा ही रणनीती मार्गदर्शक आहे आजच्या सैनिकांना सुद्धा, शिवरायांचे संपूर्ण जीवनच योग्य मार्ग दाखवणारे आहे मला तुम्हाला फक्त आपल्याला गरज आहे त्यां मार्गने चालण्याची.चला तर मग करूया सुरुवात आजपासून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिमान वाटावा असा त्यांचा मावळा बनण्याची.


जय जिजाऊ जय शिवराय..

---

# जिल्हा प्रशासनाने मारले पण प्रसारमाध्यमांनी शेतकऱ्यांना तारले

पवनचक्की कंपनीने नुकसान भरपाई सहित शेतकऱ्यांना मावेजा दिला :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश : बीड तालुक्यातील बालाघाटावरील मुळुकवाडी गावातील शेतकऱ्यांने शेतकऱ्यांच्या सहमती विना कोणताही मोबदला न देताच शेत जमिनीतुन रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन.प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली कंपनीने आमच्या शेत जमिनीतुन माझ्या कुटुंबाच्या सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारणीसाठी पोकलेन, जेसीबी,जीप, पीक अप अशा विविध वाहनांची नियमबाह्य वाहतूक करत शेजजमीनीचे नुकसान करत असल्याची लेखी तक्रार रोहित सुरेश ढास यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना दिली होती. मात्र जिल्हा प्रशासनाकडुन नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष करण्यात आले. याविषयी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून आवाज उठवल्यानंतर पवनचक्की कंपनी ताळ्यावर आली आणि ज्वारी व गहु



पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व साहित्य वाहतूक करणाऱ्या गाड्या अनुषंगाने शेतकऱ्यांना मावेजा देण्यात आला यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासनाने मारले परंतु प्रसारमाध्यमांनी तारले अशी भावना शेतकऱ्यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलून दाखवत प्रसारमाध्यमांचे आभार मानले.

मुळुकवाडी येथील गट क्रमांक ६५७ मधील ६२ आर शेतजमिनी मधुन रिन्यु ग्रीन एम. एच.पी.वन प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली कंपनीने विनासहमती शेतातुन पवनचक्की उभारणीसाठी वाहनातुन साहित्य नेल्याने जमिनीचे नुकसान होत असुन प्रतिबंध घालण्यात यावा अशी तक्रार जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना केली होती. मात्र जिल्हा प्रशासनाने याची दखल घेतली नव्हती. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्रसारमाध्यमांना याबाबत कल्पना दिल्यानंतर विविध दैनिकात याबाबत बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या.अखेर पवनचक्की कंपनीचे अधिकारी यांनी पवनचक्कीशी संबंधित गट क्रमांक.६४३,६४५,६४८,६४९,६५०,६५१ मधील सर्वच शेतकऱ्यांना ज्यांच्या शेतजमिनीतुन वाहनांची वाहतुक होते त्यांना प्रति गुंठा १५ हजार रुपये मावेजा व ज्या शेतकऱ्यांचे ज्वारी व गहु पिकांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई दिली आहे.त्यामुळे एकंदरीतच प्रसारमाध्यमांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे. जिल्हा प्रशासनाची जबाबदारी प्रसारमाध्यमांनी पार पाडली असे मत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केले आहे.

---

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त

## बीडमध्ये जय छत्रपती शिवाजी-जय भारत पदयात्रा

बीड / प्रतिनिधी

केंद्र शासनाचा युवा कल्याण व क्रीडा मंत्रालय तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने १९ फेब्रुवारी रोजी जय छत्रपती शिवाजी-जय भारत पद यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य व राष्ट्राच्या शाश्वत विकासात युवकांचे मोलाचे योगदान आहे. युवकांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास होऊन व्यक्तिमत्व विकास, सामाजिक सेवाभाव तसेच शासकीय उपक्रमाबाबत माहिती व सहयोग यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.सदरील पदयात्रा १९ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता जिल्हा क्रीडा संकुल सहयोग नगर, येथून निघणार असून ती सारडा कॉम्प्लेक्स चौक शहर पोलीस स्टेशन चौक, सुभाष रोड मार्गे भाजी मंडई चौक बहीण चौक व छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे जाणार आहे.

पदयात्रा सकाळी नऊ वाजता सुरू होणार असून याचा समारोप छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सकाळी साडेदहा वाजता होणार आहे यात अधिकाधिक युवकांनी तसेच शालेय विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. पदयात्रेबाबतचा आढावा आज एका बैठकीत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी घेतला. या पदयात्रेत नववी ते अकरावी वर्गातील स्काऊट गाईड विद्यार्थी तसेच इतर विद्यार्थी, विद्यार्थिनी खेळाडू, नागरिक शासकीय अधिकारी



कर्मचारी आदी सहभागी होणार आहेत. यात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

---

# पवित्र रमज़ान निमित्त फळ,खायचं पदार्थ,मेवा विक्रेत्यांना जागा निश्चित करा

## स्वच्छता,विद्युत पुरवठा,पाणीपुरवठा अश्या नागरी सुविधा पुरवा - शेख रशिद

माजलगाव/ प्रतिनिधी

मार्च महिन्यापासून मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरु होणार असुन शहरातील रहदारी,पार्किंगचा विचार करुन फळ, खायचं पदार्थ,मेवा विक्रेत्यांना जागा निश्चित करुन रोज साफसफाई करावे तसेच पाणीपुरवठा, विधुत पुरवठा, स्वच्छता आदी आवश्यक नागरी सुविधा मुबलक प्रमाणात पुरवा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी याना ई-मेल द्वारे केली आहे.

जिल्हाधिकारी साहेब बीड ई-मेल द्वारे निवेदणात रमजानच्या महिण्यात शहरात दररोज नियमीत साफसफाई करावे तसेच प्रत्येक मस्जीद जवळील साफसफाई करावे, रमजान माहिन्यात एक दिवस आड नियमीतपणे पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावे तसेच प्रत्येक प्रभागात बंद असलेले एलईडी लाईट दुरुस्ती करुन ते चालू करावे. ज्या विधुत पोलवर लाईट नाही त्या ठिकाणी नविन एलईडी तात्काळ बसविण्याची व्यवस्था व्हावी, शहरातील विद्युतपोलवरील दिवे नादुरुस्त असल्यास दुरुस्ती करुन पुर्ववत चालु करावे, विद्युत पुरवठा खंडित न करण्यात यावे तसेच ईद दिवशी पहाटे नळाला पाणी पुरवठा करावा, रमजानच्या महिण्यात रोजा (उपवास) सोडण्यासाठी आवश्यक असलेल्या फळ, खायचं पदार्थ,मेवा विक्रेत्यांसाठी मुस्लीम भागात हैकर झोन निश्चित करुन फळ, खायचं पदार्थ,मेवा विक्रेत्यांना आवश्यक



सुविधा त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावे तसेच पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा, स्वच्छता अश्या नागरी सुविधा तात्काळ उपलब्ध करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी यांना ई-मेल पाठवुन मागणी केली आहे.

---

# रोहन गलांडे यांचे विविध मागण्यासाठी अमरण उपोषन !

## मागण्या मान्य नाही झाल्या तर २८ तारखेला आमरण उपोषण

केज/ प्रतिनिधी

केज येथील विविध मागण्यासाठी जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे पाटील यांनी २८ फेब्रुवारी २०२५ तारखेला आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे या विषयी निवेदनाद्वारे मागण्या आहेत .शासन आदेशानुसार कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर स्थापन केलेले कक्ष पुन्हा सुरु करणे जर मागण्या मान्य नाही



झाल्या तर २८ फेब्रुवारी २०२५ रोजी अमरण उपोषन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देतो असे रोहन गलांडे यांनी म्हटले आहे तसेच केज पंचायत समितीचे बीडीओचे अधिकार ग्रामसेवक कडे देणाऱ्या बीडीओ दिवाने यांच्या वर व ग्रामसेवक ओम चोपणे यांच्या वर योग्य ती कारवाई करण्यात यावी अन्यथा २८ फेब्रुवारी रोजी अमरण उपोषन करण्यात येईल तसेच चिंचोली माळी ते हादगाव मंजूर रोडचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे अन्यथा २८ फेब्रुवारी रोजी अमरण उपोषन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग केज यांना दिला आहे तसेच केज तालुक्यातील काळेगाव येथील जलजिवन मिशन अंतर्गत झालेल्या कामाची चौकशी करण्यात यावी अशा विविध मागण्या मान्य झाल्या नाहीत तर श्री संत नामदेव महाराज सभागृह चिंचोली माळी येथे २८ फेब्रुवारी रोजी अमरण उपोषन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे प्रशासनाला रोहन गलांडे पाटील यांनी दिला आहे.

---

# तरुणांच्या दोस्ती यारीतला दिलखुलास राजा माणुस ,सोहेल भाऊ कुरेशी !

बीड / प्रतिनिधी

काही व्यक्ती आपले जिवन जगत असतांना आपल्या कार्योतुन आणी दिलखुलास जगण्यातून समाजाच्या हृदयातील ताईत बनत असतात. समाजाप्रतीची तळमळ, धडपड, आणी काहीतरी करुन दाखवण्याची मणात असणारी उर्मी ही अशा लोकांना स्वस्थ बसु देत नसते, मोजक्या लोकांना सामाजिक भान आणी समाजातील दु:खीत ,वंचित, यांचे दु:ख बघुन आपला जन्म या लोकांच्या दु:खावर फुंकर घालण्यासाठीच झालेला आहे हि खुणगाठ मणात बांधुन ते अहोरात्र या कार्यासाठी तयार असतात. सामाजिक भाना बरोबरच आपल्या सोबत्याचे संघटन करुन आणी एका विचाराने प्रेरीत होऊन कार्य करणारे व्यक्ती तसे पाहता थोडकेच बघायला मिळतात. असेच एक व्यक्तीमत्व बीड शहरात आहे ते म्हणजेच सोहेल भाऊ कुरेशी, सोहेल भाऊ कुरेशी नाव उच्चारले कि आपसुकच बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या तोंडी नाव येते ते जावेद भैय्या कुरेशी यांचे.एकता सामाजिक ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी यांचे सोहेल भाऊ कुरेशी हे पुतणे. आपल्या काकांच्या एकता ग्रुपच्या माध्यमातून उभ्या महाराष्ट्रात समाजकारणाची चळवळ ,आणी समाजकार्य करण्यात जावेद भैय्या कुरेशींच्या या पुतणे असणार्या सोहेल भाऊ कुरेशींचा सिंहाचा वाटा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण एकता ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी हे जरी असले तरीही हा ग्रुप चालवण्यात, बीड जिल्ह्यातील घराघरात पोहचवण्यात आणी या एकता ग्रुपचे संघटन करुन तरुणांची फौज उभी करण्यात सोहेल भाऊचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या काकांच्या पावलावर पाऊल टाकत समाजाप्रती आपलं काही देणे लागते,व दु:खीत ,शोषित ,वंचितांची पाठराखण करुन त्यांना मायेचा आधार देण्याचे महान कार्य सोहेल भाऊ कुरेशी यांचे सुरुच आहे. समाजकार्यासाठी आवश्यक असते तरुणांची आणी कार्यकर्त्यांची फौज, एकता ग्रुप मध्ये अशा धडाडीच्या कार्यकर्त्यांची फौज निर्माण करण्याचे काम,आणी आपले काका जावेद भैय्या कुरेशी यांच्या पाठिशी तरुणांचा सहभाग जमवण्यात सोहेल भाऊ कुरेशी अग्रेसर आहेत, तरुणांच्या दोस्ती यारीतला दिलखुलास माणूस म्हणुन सोहेल भाऊ कुरेशी यांच्या कडे पाहीले जाते . अशा या दिलखुलास भाऊंचा वाढदीवस १८ फेब्रुवारी रोजी साजरा होतो आहे,



सोहेल भाऊ कुरेशी यांच्या वाढदीवसा निमित्त त्यांना दिर्घायुष्य लाभो आणी त्याच्या हातून समाजकार्या बरोबरच गोरगरीब दिन दलीत यांची सेवा घडो हिच वाढदीवसाची मनोकामना



नगर बीड रस्त्यावरील धामणगाव येथे हॉटेल रॉयल प्युअर व्हेज चा मोठ्या थाटात उद्घाटन सोहळा संपन्न झाली यावेळी हॉटेलचे मालक भगवान पोकळे व त्यांच्या पत्नी मंगल पोकळे यांच्या शुभहस्ते फित कापून करण्यात आल यावेळी संजय गाढवे विजय गाढवे अमोल चौधरी जगन्नाथ झिंजुर्के आशोक झिंजुर्के बंडू झांजे भगवान पोकळे सह राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते छायाचित्र सुरेश कांबळे

# पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून द्या डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाईची मागणी

अंबाजोगाई / प्रतिनिधी

अनेक वर्षापासून अंबाजोगाई शहरातील व तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांची पत्रकार भवन व्हावे सातत्याने मागणी होत असताना अद्याप लोकप्रतिनिधी यांच्याकडून पत्रकार भवना च्या मागणीची दखल घेण्यात आली नाही परंतु अंबाजोगाई चे माजी नगराध्यक्ष राजकिशोर पापा मोदी यांच्या पुढाकाराने पत्रकारांसाठी नगरपरिषद येथे तात्पुरता स्वरूपात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वाचनालय शेजारी पत्रकार कक्ष तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्त्वावर देण्यात आला आहे परंतु ज्या ठिकाणी पत्रकार पक्ष देण्यात आला ती इमारत जुनी आहे कोणत्याही क्षणी ती इमारत जमीनोदोस्त केली जाणार आहे त्यामुळे



अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीस माजी पालकमंत्री व कृषिमंत्री धनंजय मुंडे साहेब यांनी पुढाकार घेऊन ५ एक्कर जागा उपलब्ध करून दिली आहे या जागेमध्ये तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी व्यापारी संकुल उभारण्यात येणार आहे त्यामध्ये अंबाजोगाई पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाई तालुक्याच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई चे सभापती व सचिव यांना निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे

दांडीबहादर अधिकारी यांच्या कार्यालयाचे स्टींग ऑपरेशन करण्यासाठी

# मनसेचे कैलास दरेकर यांनी मागितली तहसीलदार यांच्याकडे परवानगी

आष्टी ।सुरेश कांबळे

शासनाने प्रत्येक कार्यालयासाठी पाच दिवसांचा आठवडा केला आहे या पाच दिवसांच्या आठवड्यात सुद्धा काही कर्मचारी अधिकारी पाच दिवस उपस्थित नसतात ते कुठे असतात हे कुणालाच माहीत नसतं कार्यालयीन वेळ सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ वा. ची वेळ परंतु कोणता कर्मचारी अधिकारी केव्हाही येतात जातात यामुळे सर्वसामान्य जनतेला नाहक त्रास होतो त्यांची छोट छोटी कामं खोळबंतात तसेच अनेकदा अनेक कार्यालत महापुरुषांच्या जयंती सुद्धा साजरी करण्याची पद्धत नाही संबंधित कार्यालयातील अधिकारी यांना याचं भान रहात नाही यामुळे आष्टी तालुक्यातील सर्व कार्यालयातील गैरहजर अधिकारी कर्मचारी यांच्या कार्यालयावर स्टींग ऑपरेशन करण्याची परवानगी मनसेचे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी निवेदन देवून तहसीलदार यांच्याकडे परवानगी मागितली आहे मा.तहसिदार कैलास दरेकर यांना स्टींग ऑपरेशन करून व्हिडिओ चित्रीकरण करण्याची परवानगी देणार का? याकडे सर्व मतदारसंघाचं लक्ष लागले आहे.

# अंथरवन पिंपरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसमेलन संपन्न

**विद्यार्थ्यांनी. आपल्या शैक्षणिक क्षेत्राच्या कलागुणांच्या बरोबर आपले आरोग्य सुद्धा सांभाळा. डॉ. सुनीलजी बोबडे**

बीड / प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अंथरवन पिंपरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.सुनील जी बोबडे सर यांच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमा प्रसंगी डॉ सुनील जी बोबडे सर म्हणाले आहेत की आपल्या शिक्षण क्षेत्रा बरोबर आपल्या आरोग्याकडे पण लक्ष देण्यात यावे असे आव्हान डॉ.सुनील बोबडे यांनी केले आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत कोळी गीत आदि. नाट्यमय उपक्रम. सादर केले. यावेळी या कार्यक्रमाला. उपस्थित गावच्या सरपंच शिवगंगा



भाऊराव प्रभाळे. गावचे उपसरपंच अशोक शिंदे. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कानिफनाथ शिंदे. उपाध्यक्ष सचिन शिंदे. ग्रामपंचायत सदस्य संतोष शिंदे. माजी सरपंच बबनराव वाघमारे. सहशिक्षक वैभव प्रभाळे. बापूराव प्रभाळे.अशोक शिंदे. दिलीप भाऊ प्रभाळे सामाजिक कार्यकर्ते. शाळेचे मुख्याध्यापक थोरात सर. माळवदे मॅडम. भांगडे मॅडम. जाधव मॅडम. कदम मॅडम. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन बी जाधव सर यांनी केले.

# बीड येथे धनगर समाजाचा राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

**प्रा. अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष**

बीड / प्रतिनिधी

राजे मल्हाराव होळकर सामाजिक प्रतिष्ठाण यांनी धनगर समाजाचा राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन १६ मार्च २०२५ रविवार रोजी ११. वा. भगवान प्रतिष्ठाण बार्शी रोड बीड तालुका जिल्हा बीड येथे आयोजन करण्यात आलेले आहे.आजच्या धकाधकीच्या जीवनात पालकांना पाल्यांचे विवाह जुळविणे दुरापास्त होत आहे. यामुळे आपल्या पाल्यांना योग्य जोडीदार मिळणे कठीण होत आहे. यासाठी मुलां-मुलींला योग्य जोडीदार मिळण्यासाठी



पालकांनी आपल्या डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, प्राध्यापक वकील व शेतकरी मुला मुलींचे व अन्य क्षेत्रातील नोकर व गरजु मुलां-मुलींचा बायोडाटा दि.२८/०२/२०२५ पर्यंत महाराष्ट्रातून मुला मुलींचा बायोडाटा पोस्टाने किंवा प्रत्यक्ष किंवा व्हाट्सअप नंबर वर पाठवण्यासाठी आवाहन राजे मल्हारराव होळकर सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अंकुशराव येळे यांनी केले आहे यांनी संपर्कासाठी अंकुशराव येळे ९८९०९०७२६१, प्रा.भगवान माने ७०२००१४१४६, ॲड.राजु शिंदे ९४२२७०२८४३, प्रा.राजेंद्र गाडेकर ७०२०९७७१००, प्रा.भास्कर चादर ९४२०३८९०१४, आण्णासाहेब मतकर ७७९८०९०८१६,तानाजी लासुने सर ९८६०२२५३३८, धवण सर, विशाल देवकते ९८९०६३६३९५, रामदास निर्मळ महाराज ९०४९५९३२५२, प्राध्यापक रेखाताई निर्मळ , संगीताताई मस्के, संतोष वाघमोडे,या नंबरवर व्हॉटॲपद्वारे पाठवावे असे आवाहन राजे मल्हाराव होळकर सामजिक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष माननीय अंकुशराव किसनराव येळे यांनी केले आहे

# २३ फेब्रुवारीला पुणे येथे शिक्षकेत्तर कर्मच्या-यांचे राज्यस्तरीय अधिवेशन/कार्यशाळा



बीड / प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविघालयीन व समूह विघापीठे शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन/नविन शैक्षणिक धोरणा बाबतची कार्यशाळा गणेश कला क्रिडा मंच,स्वारगेट,पुणे येथे संपन्न होत आहे.या अधिवेशनात शासनाने केलेल्या कामाच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे त्याच बरोबर शिक्षकेत्तर कर्मच्या-यांचे जे काही प्रलंबीत प्रश्न आहेत त्या प्रश्नांनां वाचा फोडण्यासाठी व नविन शैक्षणिक धोरणा बाबतची माहीती ईत्यादी विषयावर अधिवेशन संपन्न होत आहे.

या अधिवेशनाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.चंद्रकांत दादा पाटील,उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री मा.इंद्रनील नाईक,व केंद्रीय राज्यमंत्री मा.मुरलीधर मोहोळ, आणखी काही मा.मंत्री व मा.आ.विक्रम काळे.मा.आ.सतिश चव्हाण,मा.आ.विजयसिंह पंडीत व आणखी लोक प्रतीनिधी त्याच बरोबर प्रधान सचिव मा. बी.वेणूगोपाल रेड्डी,राज्याचे शिक्षण संचालक मा.शैलेंद्र देवळाणकर यांच्या उपस्थितीत व प्रमुख मार्गदर्शनाखाली हे अधिवेशन संपन्न होत आहे. त्याच बरोबर उच्च शिक्षण विभागातील उच्च पदस्थ अधिकारी हे अधिवेशनाला उपस्थित असणार आहेत.

या अधिवेशनाला राज्यातील जास्तीत जास्त शिक्षकेत्तर बंधु भगिनी त्याच बरोबर सेवानिवृत्त कर्मच्यां-यानी उपस्थित रहावे,असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष मेघराज पंडीत, विष्णू खोजे,रमेश पवार,सुरेश दाभाडे,संतोष मोरे,डॉ.शिरीष देशमुख,अतुल मुंडे,सतिश जगताप,साळुंके सर व अजय जोशी,अर्जून कपे,विलास कुरे,अभिजीत सुरवसे,शैलेश पगडे,आबेद चाउस,चंदु पवार,राजेंद्र जाधव, महीला संघटक सरस्वती जाधव,प्रशांत कोल्हे,पालवे सर,वाघ सर,लालासाहेब देशमुख,राजेंद्र गोडबोले,जांभळे सर,रीजवान सर,अमजद सर व ईतर पदाधिकारी यांनी केले आहे.

# चौसाळा येथे ज्ञानदीप कोचिंग क्लासेसचा भव्य शुभारंभ

चौसाळा ।प्रतिनिधी

चौसाळा व परिसरातील ग्रामीण भागातील पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना गणित इंग्रजी विज्ञान व नवोदय स्कॉलरशिप एनटीएस एन एम एम एस अशा विविध स्पर्धा परीक्षांचे सखोल मार्गदर्शन अनुभवी व तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करण्याच्या हेतूने ज्ञानदीप कोचिंग क्लासेस चा भव्य शुभारंभ नुकताच संपन्न झाला. हा कार्यक्रम माजी वैद्यकीय अधिकारी डॉअंकुशरावजी मंचुके यांच्या अध्यक्षतेखाली व डॉक्टर येडे साहेब व डॉक्टर मोठे जोशना यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गुरुदत्त विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री चौधरी सर ,ज्येष्ठ शिक्षक श्री केदार सर ,श्री जाडकर सर. संभाजी आबा जोगदंड, श्री वैद्य सर, श्री घोडके सर मोटे सर, लिमकर सर, उमेश रावजी जोगदंड , अभियंता पोपटरावजी जोगदंड साहेब, पार्थ फाईंडर कोचिंग क्लासेसचे संचालक राऊत सर. बहुसंख्येने विद्यार्थी व पालक आदी मान्यवर उपस्थित होते. प्रथम मंचावरील मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करून



डॉक्टर अंकुशरावजी मांचुके यांनी फित कापून ज्ञानदीप क्लासेस चे उद्घाटन केले . सर्व मान्यवरांचे क्लासेस संचालक श्री रवींद्र गुरव सर. संचालक श्री लाखे सर श्री जाधव सर यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचाशाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. ज्ञानदीप कोचिंग क्लासेस चे संचालक श्री, रवींद्र गुरव सर यांनी आपल्या प्रस्ताविकातून विद्यार्थ्यांना ज्ञानदान करत असताना विद्यार्थ्यांना पायाभूत ज्ञान देऊन स्पर्धेच्या युगामध्ये सक्षम बनवले जाईल अशा प्रकारची ग्वाही उपस्थित पालक वर्गास दिली.... गेवराई क्लासेसचे संचालक श्री प्रल्हाद खेत्रे यांनी पालक वर्गाला विनंती करताना विद्यार्थ्यांना मोबाईल व प्रसारमाध्यमांच्या प्रलोभना पासून दूर ठेवा आणि आपणही आपल्या पाल्याच्या बाबतीत सतर्क रहा अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केली. कानडी घाट हायस्कूल कानडी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री जाडकर सर यांनी ज्ञानदीप क्लासेस प्रगती व यशाच्या शिखरावर पोहोचेल शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे उद्घाटक डॉक्टर अंकुशराव जी मंचूके यांनी विचार व्यक्त करताना ज्ञानदीप क्लासेस च्या माध्यमातून ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांच्या कल्याणासाठी ही सर्व शिक्षक मंडळी कष्ट घेतील व पालकांचे समाधान विश्वास संपादन करतील अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केली . गुरुदत्त विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री चौधरी सर यांनी शुभेच्छा देताना उत्तुंग आपल्या भरारी पुढे गगन ठेंगणे भासावे श्र कवेत अंबर घेताना अवघे विश्व विसावे श्र श्र असे मानस व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री राठोड सर यांनी केले. सर्व मान्यवरांचे उपस्थितांचे आभार ज्ञानदीप कोचिंग क्लासेस चे संचालक श्री रविंद्र गुरव सर यांचे मार्गदर्शक व गुरुदत्त विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री केदार सर यांनी मानले.

# श्री. हरी कुंडरे सरांना ‘विश्व आदर्श शिक्षक पुरस्कार’ जाहीर

प्रतिनिधी : विश्व इंटरनॅशनल स्कूल उक्कडपिंप्री ता.गेवराई जि.बीड येथील गणित व कलाशिक्षक श्री.हरी हिरामन कुंडरे यांना ‘विश्वआदर्शशिक्षकपुरस्कार’ जाहीर झाला.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी छ.संभाजीनगर येथील संत एकनाथ रंगमंदिर येथे श्री. सदानंद खन्ना (महानगरपालिका समीती) यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान केला जाईल.

श्री.कुंडरे सरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ संभाजीनगर येथे कमवा व शिका अंतर्गत च.झहळश्र चे शिक्षण घेतले. कहार समाजात मच्छीमार म्हणून जगण्याची सुरुवात केलेल्या त्यांच्या आई-वडीलांनी जीवनाच्या सुरुवातीला अनेक संघर्षाला सामोरे जात हरी सरांना घडवले; पुढे श्री. हरी सरांनी विश्व इंटरनॅशनल स्कूल येथे अनेक मुलांच्या जीवनात आनंद पेरण्यासाठी कायम धडपड करत आहेत.शाळेतील शेतकऱ्यांच्या मुलांसाठी त्यांनी अनेक वर्षे ‘झाडा खालची शाळा’ हा उपक्रम राबवून त्यांच्या गुणांना संधी दिली. आपण ज्या परिस्थितीतून घडलो, त्या परिस्थितीची जाणीव ठेवत ग्रामीण भागातील मुलांसाठी काहितरी भव्यकरण्यात कायम पुढे राहिले आहेत. कोरोना काळातील ''झाडाखालची शाळा'' या उपक्रमास त्यांना परिसरातून भरभरून प्रतिसाद मिळाला आहे.

श्री. हरी कुंडरे सर हे गेली ९ वर्षे विश्व इंटरनॅशनल स्कूलमध्ये गणित व कलाशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले व त्यांच्या विद्यार्थ्यांनी विभागीय पातळीवर नावलौकिक गाजवला आहे.यासह ते बीड जिल्ह्यातील सांस्कृतिक, सामाजिक,



शैक्षणिक क्षेत्रात अनाथ व निराधार बालके,अशा वंचित घटकांसाठी काम करत आहेत.या पुरस्कारासाठी त्यांना सर्व मित्र-परिवार शिक्षक, कर्मचारी, पालक यांच्याकडून शुभेच्छा मिळत आहेत.



**बुलढाण्यात आमचं स्वागत**

**बुलढाणा जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकारांना पत्रयोगी जीवन गौरव पुरस्कार कार्यक्रमासाठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार आम्ही तिथे गेलो होतो. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजितसिंह राजपूत यांनी व त्यांच्या टीमने आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलो. आम्ही सर्किट रेस्ट हाऊसमध्ये थांबलो होतो. त्यावेळी बुलढाणा जिल्ह्याचे भुमिपुत्र केंद्रीय आयुष मंत्री ना.प्रतापराव जाधव त्याच बरोबर मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांनी डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे राज्य सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर, टिव्ही न्कर प्रसन्न जोशी,प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाठ,परभणी जिल्हा अध्यक्ष प्रभु दिपके, पत्रकार धम्मपाल डावरे सह आदींची उपस्थिती होती.**

# मधुकर महाराज खाडे यांच्या जाण्याने मुकुंदराज संस्थानची मोठी हानी झाली

**ह.भ.प.किसन महाराज पवार यांचे प्रतिपादन; होळ येथे सुश्राव्य किर्तन**

प्रतिनिधी । केज

मधुकर महाराज खाडे यांच्या निधनाने केवळ होळच्या भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचीच नव्हे तर अंबाजोगाई येथील मुकुंदराज संस्थानचीही मोठी हानी झाली आहे, असे प्रतिपादन अंबाजोगाई येथील मुकुंदराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.किसन महाराज पवार यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक



ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या मार्गदर्शनाखाली गंगापुजनानिमित्त भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह होत आहे.
ह.भ.प.किसन महाराज पवार हे सोमवारी (दि.१७) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. यावेळी होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री, किर्तनकार ह.भ.प. प्रा.ईश्वर महाराज मुंडे, ह.भ.प.कृष्णा महाराज रेवले, वाल्मीक महाराज खाडे यांची उपस्थिती होती.
किसन महाराज पवार यांनी संत तुकाराम महाराज यांचा रंगी रंगे रे श्रीरंगे ख काय भुललासी पतंगे खख शरीर जायाचे ठेवणे ख धारिसी अभिलाष झणे खख नव्हे तुझा हा परिवार ख द्रव्यदारा क्षणभंगूर खख अंतकाळीचा सोयरा ख तुका म्हणे विठो धरा खख हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. किसन महाराज पवार म्हणाले, ईश्वराने दिलेले शरीर एकदिवशी जाणारच आहे, त्यामुळे शरीर आहे, तोपर्यंत ईश्वर सेवेत समर्पित केले पाहिजे. ईश्वराचे चिंतन केल्याने समाधान प्राप्त होते. मृत्यूनंतर सोबत धन, कुटुंब, शरीर असे काहीच येत नाही. केलेल्या कर्माची पावती मात्र सोबत राहत असते. मधुकर महाराज खाडे यांच्या कर्माची पावती सर्वश्रुत आहे. ते होळ येथील भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचा आधारस्तंभ होते. त्यांचा मुकुंदराज संस्थानमध्ये नेहमी संपर्क असायचा. त्यांच्या जाण्याने मुकुंदराज संस्थानचीही हानी झाली. त्यांनी ह.भ.प.अर्जुन महाराज लाड गुरुजी यांच्या सहवासात संपूर्ण जीवन घालवले. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था, शिवछत्रपती क्रीडा व व्यायामशाळा उभारली. त्यातून असंख्य रत्न घडविले, असे मत किसन महाराज पवार यांनी व्यक्त केले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांचे होणार काल्याचे किर्तन

होळ येथे श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक, व्याकरणाचार्य ह.भ.प. अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे बुधवारी (दि.१९) काल्याचे किर्तन होणार असून कीर्तन सप्ताहाची सांगता आहे. तसेच, वै.पै.मधुकर महाराज खाडे यांच्या गंगापुजनाचा कार्यक्रम होणार आहे. या किर्तन, कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन खाडे परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

# असीम साहस, दुर्दम्य इच्छाशक्ती आणि शून्यातून विश्व निर्माण करण्याची क्षमता असलेले छत्रपती शिवाजी महाराज

**छत्रपती शिवाजी महाराज जयंती हा महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध सण व उत्सव आहे . शिवजयंती हा सण मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मदिवसानिमित्त महाराष्ट्र सरकारने निश्चित केल्याप्रमाणे १९ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रभर साजरा केला जातो . महाराष्ट्राबाहेरही काही ठिकाणी हा उत्सव साजरा केला जातो . सर्वात अगोदर महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिवजयंती साजरी केली.**

**शिवजयंती साजरी करण्यामागचा उद्देश असा की छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार समाजातल्या प्रत्येकापर्यंत पोहोचावेत . १८९५ मधे लोकमान्य टिळकांनी शिवजयंती उत्सव सुरू केला . जनतेने एकत्र येऊन अशा उत्सवांच्या निमित्ताने राष्ट्रप्रेम जागवावं आणि त्याचा वापर ब्रिटिशांविरुद्ध लढा देण्यासाठी करावा असा हेतू यामागे होता . सुरुवातीच्या काळात शिवजयंती फक्त महाराष्ट्रात साजरी होत होती . परंतु २० व्या शतकाच्या पहिल्या दशकात शिवजयंतीचा उस्तव बंगालमधे जाऊन पोहोचला .**

बंगालमधे शिवजयंतीची सुरुवात करण्याचे श्रेय ' सखाराम गणेश देऊस्कर ' यांना जाते . ते लोकमान्य टिळकांचे अनुयायी होते . देऊस्कर जन्माने महाराष्ट्रीयन , परंतु बंगालमधे स्थायिक होते . शिवरायांच्या प्रेरणेने ब्रिटिशांविरोधात जनमत तयार करण्यास या उत्सवाची बरीच मदत झाली .

रवींद्रनाथ टागोर यांनीही त्याकाळी ' शिवाजी उत्सव ' नावाची कविता लिहून शिवाजी महाराजांची स्तुती केली . त्यांच्या त्या कवितेत ते म्हणतात – हे शिवाजीराजा हा देश स्वतंत्र करण्याचा विचार तुमच्या मनात स्फुरला तेव्हा माझी बंगभूमी मूक राहिली . पण तुम्ही दिलेला स्वातंत्र्यप्रेरकतेचा मंत्र कायम आमच्या मनात तेवत राहील .

लोकमान्य टिळकांनी शिवजयंती साजरी करण्याचा पायंडा पाडला आणि पूर्ण महाराष्ट्रात शिवजयंती जोरदार साजरी होऊ लागली . इंग्रजांच्या विरोधात तरुणांची एकी होणं आणि तरुण राष्ट्रविचारी होणं गरजेचं होत . त्यासाठी टिळकांनी शिवजयंतीचा कार्यक्रम दरवर्षी मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जी परंपरा आजही चालू आहे . २० व्या शतकात , डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनीदेखील शिवजयंती साजरी केली होती , ते दोन वेळा शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते . तेव्हापासून शिवजयंती मोठ्या प्रमाणावर साजरी व्हायला लागली . ३ मे १९२७ रोजी मुंबईजवळ बदलापूर येथे शिवजयंती उत्सव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली साजरा केला गेला . बदलापूरच्या गावकऱ्यांनी जातिभेद न ठेवता बाबासाहेब आंबेडकरांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले होते . बाबासाहेब आंबेडकरांनी शिवाजी महाराजांच्या लोकहितकारी राज्यपद्धतीवर भाषण केले . कीर्तनाच्या वेळी स्पृश्य व अस्पृश्यांनी एकत्र बसून कीर्तन ऐकले .

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल थोडक्यात ऐतिहासिक माहिती : –

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी । यशवंत किर्तीवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नितीवंत । जाणता राजा । समर्थ रामदास स्वामींनी या ओवीमधून छत्रपती शिवाजी महाराजांचे अतिशय सुंदर आणि मार्मिक वर्णन केलेले आहे. जे जगाने केले ते छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीच केले नाही आणि जे छत्रपती शिवाजी महाराजांनी केले ते जगाला कधीच जमले नाही .

शिवाजी महाराजांचा जन्म कुठे झाला ?

महाराष्ट्राच्या मातीत १९ फेब्रुवारी १६३० रोजी शुक्रवारी सूर्यास्तानंतर पुण्याजवळील शिवनेरी किल्ल्यावरती एका रत्नाचा जन्म झाला आणि ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज . असे म्हणतात की राजमाता जिजाऊ यांनी रयते वरती होणारा अन्याय बघून धाडसी आणि शूरवीर पुत्र होण्यासाठी शिवाई देवीला नवस केला होता . म्हणूनच जिजाऊ यांनी महाराजांचे नाव शिवाजी ठेवले .

शिवाजी महाराजांचे वडील शहाजी भोसले हे विजापूर सल्तनतीच्या सैन्यात एक मराठा सेनापती होते आणि त्यांची आई जिजाबाई या प्रतिभावान आणि हुशार होत्या . शहाजी भोसले आणि जिजाबाई यांना दोन मुले होती . त्यात मोठा मुलगा राजे संभाजी हे वडिलांसोबत असत आणि शिवाजी राजे हे जिजाबाई सोबत राहत असे .

लहानपणापासूनच जिजाबाईंनी शिवाजी राजे यांना उत्तम संस्कार , युद्ध रणनीती , माता-भगिनींचा आदर करणे , गरीबांचा आधार होणे आणि अन्याय विरुद्ध लढण्याचे धडे दिले .

बालशिवाजी यांची स्वराज्य निर्माण करण्याकडे वाटचाल : –

वयाच्या १६ व्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांनी रायरेश्वर किल्ल्यावर रायरेश्वराच्या पिंडीसमोर स्वराज्य निर्मितीची शपथ घेतली . शहाजी महाराजांनी स्वराज्याची सर्व जबाबदारी माता जिजाऊ आणि शिवाजी महाराजांकडे दिली . छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघल राजवटीला विरोध करून १७ व्या शतकात भारतात मराठा राज्याची स्थापना केली .

स्वराज्य निर्माण करायचे असेल तर गड किल्ले काबीज करणे महत्त्वाचे होते . त्यामुळे महाराजांनी लहान-मोठ्या सर्व माणसांना एकत्र आणले आणि या सर्वांना मावळे असे नाव दिले . काही निष्ठावान आणि विश्वासू माणसांसोबत आपल्या आस-पासची गडकिल्ले काबीज करण्यास सुरुवात केली . सर्वात पहिले तोरणा किल्ला काबीज केला त्यानंतर हळूहळू महाराजांनी एक-एक करत असे ३६० किल्ले काबीज केले .

अफझलखानाचा वध :- शिवाजी महाराजांनी १० नोव्हेंबर १६५९ रोजी अफझल खानाचा वध केला होता . विजापूरच्या आदिलशहाचा सरदार अफझल खान आणि शिवाजी महाराजांमध्ये प्रतापगडाच्या पायथ्याशी संघर्ष झाला . यामध्ये महाराजांनी अफजलखानाच्या पोटात वाघ नख्या खूपसून अफझल खानाला ठार मारले . अफझल खान हा हजारो सैन्य घेऊन आलेला होता आणि महाराजांकडे अगदी मुठभर मावळे होते , परंतु महाराजांनी मोठ्या चतुराईने अफजलखाना सह त्याच्या सैन्याचा नायनाट केला . महाराजांनी जेव्हा अफजलखानाला मारले त्यावेळेस महाराजांचे वय फक्त २९ वर्षे होते . आजही संपूर्ण महाराष्ट्रामध्ये या घटनेची आठवण म्हणून शिवप्रताप दिन साजरा केला जातो .

पन्हाळगडावरील वेढा :- १६६० साली पन्हाळगडाच्या वेढ्यामध्ये महाराज अडकून पडले होते . महाराजांना त्या वेढ्यातून निसटता येईना . जुलै महिन्यातील १२ आणि १३ तारखेला महाराजांनी पन्हाळगडावरून निसटण्याचा निर्णय घेतला . महाराज अतिशय चतुराईने पन्हाळगडावरून निघाले . परंतु शत्रू महाराजांच्या मागावरच होते , रस्त्यामध्ये आलेल्या घोडखिंडीमध्ये शत्रू महाराजांजवळ पोहोचले . खिंड अतिशय अरुंद आणि अवघड होती . त्यावेळेस



बाजीप्रभू यांनी महाराजांना पुढे जाण्यास सांगितले आणि स्वतः त्या खिंडीमध्ये शत्रूला रोखण्यासाठी थांबले आणि महाराज विशाळगडावर पोहोचल्यानंतर तोफेचा बार करण्यास सांगितले . बाजीप्रभूंनी त्यांच्या श्वासात श्वास असेपर्यंत या खिंडीमध्ये शत्रूला थांबून धरले . आणि जेव्हा तोफेचा आवाज ऐकू आला त्यावेळेस बाजीप्रभूंनी आपले प्राण सोडले . म्हणून या खिंडीला पावनखिंड असे नाव देण्यात आले .

सुरतची लूट : – स्वराज्य निर्मितीसाठी महाराजांना धनाची आवश्यकता होती . तसेच मुघल दरबारामध्ये महाराजांना त्यांची दहशत निर्माण करायची होती . त्यामुळे महाराजांनी १६६४ मध्ये सुरत वरती हल्ला करून सुरत लुटले . सुरत हे शहर निवडण्याचे कारण म्हणजे मुघलांचा मोठा कारभार या ठिकाणी होत असे आणि सुरत मधून फार मोठ्या प्रमाणात मुघलांना कर वसुली मिळत असे . तसेच सुरत मध्ये मोठ मोठे व्यापारी देखील राहत होते . सुरत हे मुघलांचे प्रमुख बंदर होते आणि मुघलांचा संपूर्ण व्यापार या बंदरावरूनच होत असे . त्यानंतर महाराज आग्रा भेटीला गेल्यानंतर तिथे त्यांना कैद करण्यात आले आणि औरंगजेबच्या कैदेतून चतुराईने सुटका झाल्यानंतर महाराज परत स्वराज्यामध्ये आले . स्वराज्यात आल्यानंतर पुरंदरचा तह झाला . आणि त्यानंतर सहा वर्षांनी ऑक्टोबर १६७० मध्ये परत महाराजांनी सुरत वर दुसऱ्यांदा हल्ला केला आणि ह्या वेळेस ची लुट ही तीन दिवस चालू होती .

३ एप्रिल , १६८० हा महाराष्ट्रासाठी तसेच संपूर्ण रयतेसाठी अतिशय काळा दिवस होता . याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांनी अखेरचा श्वास घेतला आणि हनुमान जयंतीच्या दिवशी रायगडावरती महाराजांचे निधन झाले . छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यु बद्दल स्पष्ट पुरावे नाहीत . काही लेखकांच्या मते छत्रपती शिवाजी महाराजांना तीव्र ताप असल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला . महाराजांनी इंग्रजांकडून विषमज्वराची औषधे मागवल्याचाही उल्लेख इंग्रजी पत्रांमध्ये आहे . काही लोकांच्या मते महाराजांना १२ दिवस सलग ताप असल्यामुळे महाराजांचा मृत्यू झाला . काही इतिहासकारांच्या मते महाराजांना गुडघी आजार झाल्याचे असे देखील म्हटले जाते . महाराजांच्या मृत्यूबद्दल कुठलाही समकालीन असा ठोस पुरावा नाही . विविध इतिहासकारांचे पुस्तकांमधील हे मत आहे .

छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श विचार पुढीलप्रमाणे आहेत : १ ) शत्रूला कमजोर समजू नका , तर त्याला खूप बलवान मानून घाबरू देखील नका . २ ) सर्वप्रथम राष्ट्र , मग गुरु , मग आई-वडील मग देव . ३ ) जेव्हा धाडस उच्च असेल , तेव्हा डोंगरही मातीच्या ढिगारासारखा दिसतो . ४ ) शत्रूंकडूनही माणूस शिकू शकतो . माणूस जितका चांगला होईल तितके त्याचे शत्रू कमी होतील .

शिवाजी महाराज हे धार्मिक सहिष्णुतेचे आदर्श उदाहरण होते . त्यांच्या कारकीर्दीत सर्व धर्मांना समान वागणूक देणे हाच त्यांचा मुख्य हेतू होता . त्यांनी लोकांमधील गुलामगिरीची मानसिकता संपवली . त्यांनी लोकांमध्ये स्वराज्याचा आत्मविश्वास निर्माण केला . त्यांनी निष्पक्षता आणि न्यायाने राज्य केले . त्यांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली .

छत्रपती शिवाजी महाराज हे एक आदर्श प्रशासक , दूरदर्शी नेते आणि समाजसुधारक होते , त्यांस कोटी कोटी प्रणाम !

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके , तहसीलदार , बीड

---

# ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त प्रकाशनार्थ

## बदलती माध्यमं आणि बदलणारी भाषा

भाषा ही माणसाला मिळालेली सर्वात मोठी देणगी होय. भाषा ही संस्कृतीची वाहक आहे.भाषेशिवाय मानवी अस्तित्व आणि मानवी संस्कृती यांची कल्पनाही करणे अशक्य. मानवी जीवनातील आणि अर्थातच मानवी संस्कृतीतील संचित भाषेच्या माध्यमातूनच एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित झाले आहे.

भाषा कुठून येते ? आपण ' मातृभाषा ' असा शब्दप्रयोग करतो तेव्हा आईची जी भाषा ती मुलाची भाषा असा अर्थ आपल्याला अभिप्रेत असतो काय ? लहान मुल त्याच्या परिसरातील भाषा आत्मसात करते.ते वाढत जाते , तसा त्याच्या परिसराचा विस्तार होतो आणि त्याचा त्याच्या भाषेवर परिणाम होतो. आमच्या छत्रपती संभाजीनगरला ( औरंगाबाद ) राहणारे लोकं घराबाहेर पडले की अगदी सहज हिंदी बोलतात.आपण ज्या विक्रेत्याकडून भाजी घेत आहोत , तो ग्रामीण भागातून आलेला आपल्यासारखाच मराठी माणूस आहे , याचा जणू विसरच पडतो आणि ' मेथी क्या भाव है ? ' असा प्रश्न हाती भाजीची जुडी घेत सहजपणे विचारतो !

प्रश्न भाषेचा असल्याने आणि भाषा ही मूलतः वैयक्तिक असल्याने काही व्यक्तिगत अनुभव नमूद करायला हवेत.साधारण पस्तीस वर्षांपूर्वी पुण्यात राहणाऱ्या मित्राने मला बजावले होते की , पुण्यात रिक्षावाल्याशी हिंदीत बोलायचे नाही ! हिंदीत बोलणारा माणूस पुण्यातील नाही म्हणजे नवखा आहे , असे रिक्षावाल्यांच्या लगेच लक्षात येते आणि मग त्यातील एखादा जवळच्या अंतरासाठी दूरचा रस्ता जवळ करू शकतो असे त्या मित्राचे सांगणे होते.दुसरा अनुभव दिल्लीतील.तेथे राहणारे माझे एक आप्त मला म्हणाले की त्यांच्या परिचयाच्या अन्य मराठी माणसांच्या तुलनेत माझी हिंदी चांगली आहे. या आप्तांना चांगल्या वाटलेल्या माझ्या हिंदीचे कारण माझे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद ) येथील वास्तव्य म्हणजे माझा परिसर हे आहे.वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांसाठी मार्गदर्शन करणारे प्रा. वसंतराव कुंभोजकर विद्यार्थ्यांना सांगत की , मराठी शब्दोच्चारांवर लक्ष द्यायला हवे. हिंदीत ' ण ' नाही पण मराठीत तो आहे आणि त्याचा उच्चार ' न ' पेक्षा वेगळा आहे ! ही सगळी उदाहरणे भाषेचे परिसराशी असलेले नाते सांगणारी आहेत. कोणतेही व्याकरण शिकण्यापूर्वी भाषा आत्मसात करण्याची मानवी क्षमता नैसर्गिक असल्याचे भाषाशास्त्रज्ञ सांगतात.

परिसरात माणसं असतात तशी माध्यमं असतात. आज तर माध्यमांचे प्रकार आणि त्यांची संख्या वाढती आहे.ही सारी माध्यमं आपल्या समोर आणून ठेवणारा मोबाईल आपल्या तर नेहमीच हाती असतो. त्याने आपला जणू सारा परिसरच व्यापला आहे. यातील बराच भाग आभासी असतो आणि तो खऱ्याखुऱ्या परिसरापासून आपल्याला नेहमी दूर नेतो , हेही लक्षात घ्यावे लागते. आपला परिसर माध्यमांनी व्यापलेला असल्याने माध्यमांच्या भाषेचा विचार करावा लागतो.

कोणे एकेकाळी ( हा कोणे एकेकाळ फार लांबचा नाही ! ) माध्यमांचे विश्व म्हणजे दैनिके , नियतकालिके , आकाशवाणी आणि दूरदर्शन असे होते. ( आकाशवाणी आणि दूरदर्शन हे शब्द रेडिओ आणि टेलिव्हिजन या शब्दांचे मराठी प्रतिशब्द नव्हेत.पण माध्यमांनी त्या अर्थाने ते रूढ केले आहेत. ' झेरॉक्स ' हा शब्दही असाच रूढ झाला आहे. मागच्या पिढीत वनस्पती तुपासाठी ' डालडा ' हा शब्दही असाच रुढ झाला होता.) जेव्हा माध्यमाचे विश्व मर्यादित होते , तेव्हा त्यांच्यातील स्पर्धाही मर्यादित होती. ( माणसाची झोप ही आमची प्रतिस्पर्धी आहे , असे म्हणणाऱ्या ' नेटफ्लिक्स ' चा काळ तेव्हा कल्पनेतही नव्हता !) एकूण जीवनाला आजच्या सारखी गती नव्हती. ' सर्वात आधी आणि सर्वांच्या पुढे ' हा आजचा जीवनमंत्र तेव्हा माध्यमांनी स्वीकारलेला नव्हता. तेव्हा तंत्रज्ञान आजच्या इतके गतीमान नव्हते आणि त्याच्या गतीची मर्यादा स्वीकारली गेली होती.माध्यमे तंत्रज्ञानप्रधान नव्हती.तेथे काम करणारे आणि वाचक ( ग्राहक नव्हे !) महत्वाचे होते.वाचकांची जडणघडण आपण करू शकतो , ही भूमिका तेव्हा रूढ होती म्हणूनच काही दैनिके राशिभविष्य छापत नव्हती. काही दैनिके आसाम ऐवेजी असम , पंतप्रधान ऐवेजी प्रधानमंत्री , मध्यपूर्व ऐवेजी पश्चिम आशिया , उत्तरपूर्व ऐवेजी इशान्य असे शब्द जाणीवपूर्वक उपयोगात आणत.त्या काळातील भाषा ही बहुतेकवेळा प्रमाणभाषेशी नाते सांगणारी होती. मराठी शब्द कटाक्षाने वापरण्याकडे कल होता.आज एका बाजूला कम्प्युटर हा शब्द वापरला जातो आणि त्याच वेळी डेटा या शब्दासाठी विदा हा शब्द रूढ करण्याचा प्रयत्न सुरू असतो आणि यात विसंगती आहे , असे कोणालाही वाटत नाही. हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्ट यांना अनुक्रमे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय हे रूढ झालेले शब्दही वापरले जात नाहीत. काही वेळा मुख्य न्यायाधीश आणि सरन्यायाधीश असा फरक केला जात नाही. दिनांक ऐवजी तारिख , सप्ताह ऐवेजी आठवडा असे सोपे शब्द रुजवण्यासाठी प्रयत्न झाले , याचा आता विसर पडला आहे. हे घडत आहे याची अनेक कारणे आहेत. वर्तमानपत्रांच्या जगात पूर्वी बातमी असो की लेख , ते संपादकीय संस्कार केल्यानंतरच पुढे पाठवले जात. वार्ताहर , मुख्य वार्ताहर ,उपसंपादक , मुख्य उपसंपादक , वृत्तसंपादक...असा पायऱ्या तेव्हा केवळ नामाभिधानासाठी अस्तित्वात नव्हत्या तर त्यांची स्वतंत्र कार्ये निर्धारित होती.आज

१८ वे

अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

ही पदं अस्तित्वात आहेत पण त्यांची दैनंदिन कार्ये बदलेली दिसतात. हा बदल तंत्रज्ञानातील बदलासोबत आला.तंत्रज्ञान गती आणि स्पर्धा घेऊन आले. त्याने माध्यमांचे स्वरूप बदलले. मुद्रितशोधक हद्दपार झाला.बातमीदार असो की लेखक , तोच त्याच्या मजकूराचा अनेकदा उपसंपादक ठरू लागला. जी दैनिके वेगळी जिल्हा पाने देतात , त्या पानांत या स्थितीचे प्रतिबिंब सहज दिसते.याचा परिणाम भाषेवर झाला. काहींनी नव्या पिढीशी नाते जोडायचे म्हणून त्या पिढीच्या भाषेशी नाते जोडण्याचा व्यावहारिक आग्रह धरला.त्याला कधी तात्विक रूप दिले. त्यातून भाषेचे रूप आणखी पालटले. महानगरातील भाषेत जशी इंग्रजी आणि हिंदीची सरमिसळ झालेली असते तशीच भाषा दैनिकातून डोकावू लागली. महानगरात राहणारी नवी पिढी इंग्रजी माध्यमातून शिकते.त्याच पिढीतील प्रतिनिधी आज वेगवेगळ्या माध्यमातून काम करतात.मग वटहुकूम आणि शासन निर्णय , विधेयक आणि कायदा यात फरक केला जात नाही. मराठीत क्रियापदांचे अनेकवचनी रूप असते , आदरार्थी अनेकवचन उपयोगात आणण्याची पद्धत आहे अशा बाबींचा विसर पडतो.

कोणतीही भाषा स्थिर असू शकत नाही आणि भाषेने अन्य भाषांमधील शब्द स्वीकारण्यास काही प्रतिबंध असू शकत नाही.पण असे शब्द स्वीकारताना आपल्या मूळ भाषेला रजा देण्याची गरज नाही.बँकेला बँक म्हणावे पण चेक साठी धनादेश हा शब्द सर्वांना समजतो ना ? आपल्या भाषेविषयी मराठी माणूस जागरूक नाही , ही विदारक वस्तुस्थिती आहे. मागे नगरला ( आजचे अहिल्यानगर ) साहित्य संमेलन झाले तेव्हा सुप्रसिद्ध दिग्दर्शक बासू भट्टाचार्य म्हणाले होते की, कलकत्ता शहरात सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ राहायचे असेल तर बंगाली भाषा शिकावीच लागते.पण महाराष्ट्रात तशी परिस्थिती नाही.येथे पिढ्यानपिढ्या राहणारी माणसं मराठी नव्हे तर त्यांची मातृभाषा आणि हिंदी / इंग्रजी बोलत राहू शकतात.राहतात.

असे म्हणतात की ही विदारक वस्तुस्थिती ते सांगत होते तेव्हा सभामंडपातील प्रेक्षक टाळ्या वाजवत होते

आपल्याकडील माध्यमात याच अवस्थेचे प्रतिबिंब पडले आहे. त्यामुळे अनेकदा माध्यमातून कानी पडणारी किंवा वाचनात येणारी मराठी ही अनेकदा मराठी वळणाची राहिलेली दिसत नाही. त्यातून मग ' धन्यवाद ' मानतो ' / ' मानते ' यासारखे शब्दप्रयोग रूढ होतात. आभार मानले जातात आणि धन्यवाद दिले जातात हे लक्षात घेतले जात नाही.

आपल्याकडे दूरचित्रवाणीचा झपाट्याने विस्तार होत असताना एका मान्यवरांनी असे लिहिले होते की , पाश्चात्य देशात ' मुद्रण संस्कृती ' रुजल्यानंतर तेथे टेलिव्हिजन आला.आपल्याकडे मुद्रण संस्कृती रुजण्यापूर्वीच टेलिव्हिजन आला आणि विस्तारत असून त्याचे काही दुष्परिणाम संभवतात.भाषेच्या बाबतीत हे दुष्परिणाम आपण आता अनुभवत आहोत.मुद्रीत माध्यम हे शब्दप्रधान आहे. नभोवाणीचे माध्यम शब्दच आहे. टेलिव्हिजनचे माध्यम कॅमेरा आहे. लिहिले जाणारे शब्द आणि टिपले जाणारे दृश्य यात अंतर असणार हे उघड असले तरी ते माध्यमांचा परस्परांवर परिणाम होऊ नये म्हणून आवर्जून लक्षात घेणे फार आवश्यक आहे. क्रिकेटच्या सामन्याचे दूरचित्रवाणीवरून होणारे थेट प्रक्षेपण , नभोवाणीवरून त्याच सामन्याचे प्रसारित होणारे धावते वर्णन आणि त्याच सामन्याचा दुसऱ्या दिवशी प्रसारित होणारा वृत्तांत यात फरक असणे स्वाभाविक आहे.असाच फरक या तीन माध्यमातून येणाऱ्या अन्य बाबींबद्दल असायला हवा. बोलण्याची भाषा आणि लिहिण्याची भाषा यात असणाऱ्या फरकाची जाणीव ठेवणे ही प्राथमिक गरज आहे.आपल्याकडे जेव्हा एखाद्या महत्वाच्या घडामोडीचे तपशील दूरचित्रवाणी वाहिन्यांवर दाखवले जातात तेव्हा कॅमेरा त्याचे दृश्य टिपण्याचे काम त्याच्या यांत्रिक क्षमतेने आणि वेगाने करीत आहे , मानवी तोंडातून निघणारे शब्द त्याच्याशी स्पर्धा करू शकत नाहीत याचा निवेदकांना / बातमीदारांना विसर पडलेला दिसतो. वर्तमानपत्रातही हे घडत असल्याचे हल्ली अनुभवास येते.तपशिलाच्या पसाऱ्यात नेमकेपणा हरवून जातो.हा माध्यमांचा परस्परांवर होत असलेला परिणाम आहे.असाच परिणाम मांडणीतही होत असल्याचे अनुभवास येते. छोट्या पडद्यावर एकाच वेळी निवेदक / वार्ताहर दिसतो , त्यांचा ज्यांच्याशी संवाद सुरू असतो तेही दिसतात , जे काही दाखवले जात आहे , त्याच्याशी निगडीत शब्दांकन दिसत असते , ' स्क्रोल ' सुरू असतो , कोपऱ्यात तपमान वगैरे दिसत असते.हे सारे रंगीत असते. वर्तमानपत्रातही मांडणीत अनेकदा अशी गर्दी दिसते.तेथे पुरेसे अंतर राखणारी कोरी जागा अर्थपूर्ण ठरते याचा विसर पडत चाललेला आहे.

आपल्याकडे वाहिन्या बहुभाषक असणे अपरिहार्य आहे.त्याचेही भाषेवर दुष्परिणाम होत आहेत. हिंदीत ' खुलासा ' हा शब्द ज्या अर्थाने वापरला जातो , त्या अर्थाने तो मराठीत उपयोगात आणला जात नाही. पण हल्ली हा ' खुलासा ' मराठीत ऐकू येत असला तरी तो हिंदीतील आहे , हे लक्षात घ्यावे लागते ! अशी किती तरी उदाहरणे देता येतील. हल्ली लहान मुलं त्यांच्या संभाषणात खूप हिंदी शब्द वापरत असतात.त्याचा उगम ते पाहतात त्या ' कार्टुन शो ' मध्ये आहे. आपल्याकडील लग्नसमारंभातील मराठीपण जसे हळूहळू हरवत आहे , तसेच भाषेचेही होत आहे ! कौटुंबिक नात्यातील मराठी संबोधने बाजूला पडत असून भाऊजी या शब्दाची जागा जिजाजी , मेहुणा या शब्दाची जागा साला या शब्दांनी घेतली आहे.एकेकाळी वर्तमानपत्रांनी परिभाषेत भर घातली.आता व्यवहारात रूढ झालेले मराठी शब्द बाजूला सारून तेथे इंग्रजी / हिंदी शब्दांचा उपयोग सुरू आहे , याचा पदोपदी अनुभव येतो.

एकीकडे माध्यमातील नवी पिढी कार्यक्षम आणि तंत्रस्नेही असल्याचा अनुभव येत असतानाच त्यांचा मराठी शब्दसंग्रह मर्यादित होत असल्याचे जाणवते.याचे कारण या पिढीत मराठी साहित्याचे वाचन कमी झाले आहे , हे असावे. इंग्रजी माध्यमातून होणारे शिक्षण , बहुभाषक परिसरात संपर्कासाठी सहजपणे उपयोगात आणली जाणारी हिंदी , माध्यमांना आलेले तंत्रज्ञानप्रधान व्यवसायाचे रूप , उसंत न देणारी वाढती स्पर्धा या आणि अशा काही कारणांमुळे आजच्या माध्यमात दिसणारी भाषा विचित्र रूप धारण करीत आहे. माध्यमांचा समाजमनावर होणारा परिणाम लक्षात घेता माध्यमांकडून उपयोगात आणली जाणारी भाषा महत्वाची ठरते. ती निष्कारण कठीण , बोजड नको तशीच स्वत:चे अस्तित्व सहजपणे विसरणारीही नको.ती पुढे जाणारी , स्वागतशील हवी आणि तिचे नाते तिच्या मुळाशी हवे.

राधाकृष्ण मुळी
निवृत्त संचालक
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT